लोकमत
कोल्हापूर, सोमवार, दि. २७ जून २०१६

तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कौशल्यपूर्ण शिक्षण

फडणवीस : शिवाजी विद्यापीठातील व्हर्च्युअल क्लासरुमचे उद्घाटन; वृत्तपत्र विद्या विभागाच्या इमारतीचे भूमि

: एकविसाव्या शतकात
दिशा या रस्त्यांद्वारे नव्हे,
च्या माध्यमातून जात आहेत.
सर्व ज्ञान तंत्रज्ञानात
झाले आहे. अशा
त विद्यापीठांनी डिजिटल
ती आणि नवतंत्रज्ञानाच्या
कौशल्यपूर्ण शिक्षण द्यावे,
हन मुख्यमंत्री देवेंद्र
यांनी रविवारी येथे केले.
जी विद्यापीठातील
क्लासरूमचे उद्घाटन आणि
या व संज्ञापन
इमारतीच्या भूमिपूजन
ते बोलत होते.
तील राजर्षी शाहू
ल कार्यक्रमाच्या
ी कुलगुरू डॉ. देवानंद
उच्च व तंत्रशिक्षणमंत्री
तावडे, पालकमंत्री
पाटील, खासदार
ाजीराजे, राष्ट्रीय उच्च
नाच्या (रुसा) महाराष्ट्र
चालिका मनीषा वर्मा,

कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठातील व्हर्च्युअल क्लासरूमचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी अंध प्रा. एस. एस. वासवानी यांच्याकडून ब्रेल लिपी, ई-ग्रंथालयातील टेक्स्ट टू स्पीच संगणक प्रणालीची माहिती घेतली. यावेळी डावीकडून उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्राचार्य डॉ. नमिता खोत, पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, आदी उपस्थित होते.

विद्यापीठाचे बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे प्रमुख उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'नॅसकॉम'च्या सर्वेक्षणानुसार आपल्या देशातील शंभर पदवीधरांपैकी २५ जणच रोजगारक्षम असल्याचे चित्र समोर आले आहे. अशा स्थितीत शिक्षण आणि कौशल्यांमध्ये दरी आहे. ही दरी कमी करण्यासाठी उच्च शिक्षणातील उपयोजित संशोधनासाठी विद्यापीठांकडून प्रयत्न व्हावेत. डिजिटल शिक्षण पद्धती, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत. व्हर्च्युअल क्लासरूम हे ज्ञानाचे भांडार आहे. या नवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून व्यापक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देता येईल. संज्ञापनशास्त्र, मास कम्युनिकेशनच्या नव्या इमारतीतून विद्यार्थ्यांना अद्ययावत शिक्षण देण्यात यावे. पत्रकारितेसह सर्व क्षेत्रांतील आव्हाने सध्या बदलली आहेत. ती लक्षात घेऊन नवनवीन अभ्यासक्रमांची रचना करण्यात यावी. यात अत्याधुनिक व नवतंत्रज्ञानाचा वापर करावा.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री तावडे म्हणाले, उच्च शिक्षणातील गुणवत्तावाढीसाठी केंद्र सरकारने 'रुसा'च्या माध्यमातून महाराष्ट्रातील विद्यापीठांना एकूण ५५० कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यातून
क्लासरूम, अद्ययावत
आदींद्वारे या विद्या
गुणवत्तावाढीला मदत होणा
कार्यक्रमात वृत्तपत्रविद्या
संज्ञापनशास्त्र विभागाच्या इ
डिजिटल कौन्सिलचे
मुख्यमंत्री फडणवीस यांच्या
राजर्षी शाहू केंद्र व
कॉम्प्लेक्सच्या कोनशिलेचे
उच्च व तंत्रशिक्षणमंत्री तावडे
हस्ते झाले. यावेळी
इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेम
विद्यापीठाला २८ वा क्रमांक
मिळाल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस
हस्ते कुलगुरू डॉ. शिंदे यांचा
केले. यावेळी खासदार संज
पाटील, आमदार सुरेश हाळ
अमल महाडिक, विद्यापीठाचे
नियंत्रक महेश काकडे, डॉ.
कदम, आदी उपस्थित होते.
डॉ. शिंदे यांनी स्वागत केले.
अधिकारी आलोक जत्राटकर
पाटील यांनी सूत्रसंचालन केले.
कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिं
आभार मानले. (प्रतिनिधी)

विद्यापीठाने आघाडीवरच राहावे

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने असलेल्या शिवाजी विद्यापी
नेहमी आघाडीवरच राहावे, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी
म्हणाले, विद्यापीठाने मिळविलेले नॅकचे 'अ' मूल्यांकन,
एनआयआरएफमधील २८ वा क्रमांक, आता त्याद्वारे व्हर्च्युअल
क्लासरूमची सुरुवात हे प्रशंसनीय आहे. देशात प्रथमस्थानी विद्यापी
आता धडपड घ्यावी. प्रगतीसाठी विद्यापीठांच्या पाठीशी राज्य शासन
खंबीरपणे उभे राहील.